।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade


## Office of the Director-Board of Examinations & Evaluation


Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: srtmuncoe@gmail.com
srtmundboee@gmail.com


जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०१८–१९/2308 दिनांक : ०५/०२/२०१९

अत्यंत तातडीचे

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व सलंग्नीत महाविद्यालये
**मा. संचालक**
सर्व शैक्षणिक संकुले
न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
उपकेंद्र लातूर, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : सन २०१८–१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांची उन्हाळी २०१९ करीता परीक्षा शुल्क न स्विकारणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. परीक्षा/संपवमुमं/२०१८–१९/२१९७, दि. २८/०१/२०१९.

महोदय,

वरील विषय व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०१८–१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळसदृश्य तालुक्यातील (ट्रिगर–२) लागु केलेल्या गावातील रहिवाशी असणा–या तसेच या फी माफीसाठी पात्र असणा–या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०१९ परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र परीक्षा शुल्क न घेता स्विकारावेत असे कळविण्यात आलेले आहे.

तथापि या विषयी काही महाविद्यालयामध्ये संभ्रम निर्माण झाला असुन याबाबत विचारणा होत आहे. त्यामुळे पुनश्च: खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. राज्याच्या अधिवास असलेल्या व रु. आठ लक्ष या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषीत केलेल्या महसुल मंडळातील विद्यार्थ्यांकरीता लागु राहील. हि सवलत खालील विद्यार्थ्यांना लागु असणार नाही.

अ. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस—यांदा परीक्षेस बसले असतील

क. जे विद्यार्थी बहिस्थ म्हणुन नोंदवले असतील

ड. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात नौकरी धंदा करतात परंतू त्यांचे नावे शेत जमीन आहे अशा विद्यार्थ्यांना

२ व्यावसायिक अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत या योजनेत ५० टक्के परीक्षा शुल्क अनुज्ञेय असेल त्यांना केवळ ५० टक्के परीक्षा शुल्क माफी अनुज्ञेय आहे. त्यामुळे ५० टक्के परीक्षा शुल्क स्विकारावे व ५० टक्के माफ करुन त्यानुसार प्रस्ताव सादर करावा. यात बी.एड,एम.एड,बी.पी.एड एम.पी.एड ३ वर्षीय व ५ वर्षीय एल.एल.बी. अभ्यासक्रम व एल.एल.एम अभ्यासक्रमाचा समावेश होतो.

३ बी.सी.ए व बी.सी.एस. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना हि योजना लागु नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांकडुन पुर्ण परीक्षा शुल्क स्विकारावे.

४. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पुर्ण परीक्षा शुल्क स्विकारावे व परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र यादी परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावी. जेणेकरुन तंत्रशिक्षण संचालनालयास परीक्षाशुल्क प्रतिपुर्तीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल. यात अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र एम.बी.ए. व एम.सी.ए या अभ्यासक्रमाचा समावेश होतो

सबब, याव्दारे सर्व प्राचार्यांना पुनश्च: कळविण्यात येते की, शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एफईडी—१५९२/१२०२/११३२/संशि—५, दि.१८/१०/१९९३ व तसेच महसुल व वन विभागाचे शासन निर्णय क्र. एससीवाय—२०१८/प्रक्र८९/म—७, दि.२३/१०/२०१८ व मा. संचालक उच्चशिक्षण पुणे यांचे पत्र क्र.उशिसं२०१८/परीक्षाशुल्कशिष्यवृत्ती/१९०२३, दि.१७/११/२०१८ नुसार परीक्षा फी माफीसाठी पात्र असणा—या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०१९ परीक्षेकरीता परीक्षा शुल्क न स्विकारता आवेदनपत्रे स्विकारावेत व या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र यादी खालील नमुन्यात परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावी.